गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापित राज्य विद्यापीठ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

परिक्षा व मुल्यमापण मंडळ

फोन:— ०७१३२.२२३३५० Email :- confidential.section@unigug.ac.in

गोवि/गोपनिय/जा.क्र./१३९२/२०२६ दिनांक:. २५/११/२०२६

परिपत्रक

विषय :- हिवाळी परीक्षा २०२६ च्या अनुषंगाने Onscreen मुल्यांकनाचे कार्याकरीता महाविद्यालयातील नियमित प्राध्यापक तसेच अनुदानित महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाला शिकवित असणा-या तीन वर्ष अनुभव प्राप्त CHB प्राध्यापकांनी मुल्यांकन केंद्रावर उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ :- मा. प्र.- कुलगुरू, महोदयांची मान्यता नस्ती दिनांक २५/११/२०२६

उपरोक्त विषयान्वये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, नियमित प्राध्यापक, CHB प्राध्यापक तसेच सबंधिताना सुचित करण्यात येते की, हिवाळी परीक्षा-२०२६ च्या परीक्षेच्या अनुषंगाने Onscreen मुल्यांकनाचे कार्य चालु झालेले असुन महाविद्यालयातील अनेक नियमित प्राध्यापक Onscreen मुल्यांकनाकरीता उपस्थित राहात नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे Onscreen मुल्यांकनाचे कार्य प्रभावित होत आहे.

Onscreen मुल्यांकन केंद्राकडून मुल्यांकनाचे पत्र प्राध्यापकांना पाठविण्यात आलेले आहे. परंतु आपणास ई-मेल द्वारे पत्र प्राप्त झाले असेल/नसेल तरीही प्राध्यापकांनी आपले कार्यक्षेत्रामध्ये नेमुन दिलेल्या Onscreen मुल्यांकन केंद्राशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून तातडीने उपस्थित होऊन मुल्यांकनाचे कार्य विहीत कालावधीमध्ये पार पाडणेबाबत या परिपत्रकाद्वारे आदेशीत करण्यात येत आहे.

तसेच अनुदानित महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाला **CHB प्राध्यापक म्हणुन शिकवित असलेल्या तिन वर्ष अनुभव प्राप्त CHB प्राध्यापकांना मुल्यांकनाचे कार्य पार पाडण्याची परवानगी सदर परीपत्रकाला अनुसरून देण्यात येत असुन** अनुदानित महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाला शिकवित असलेल्या प्राध्यापंकानी सुध्दा आपले कार्यक्षेत्राजवळील Onscreen मुल्यांकन केंद्रावर उपस्थित होऊन मुल्यांकनाचे कार्य पार पाडावे. असे आदेशित करण्यात येत आहे.

ज्या नियमित व CHB प्राध्यापकांना मुल्यांकनाचे कार्य करण्याबाबतचे पत्र, Login Id व Password उपलब्ध झालेले नाही अशा सर्व प्राध्यापकांनी कार्यक्षेत्राजववळील मुल्यांकन केंद्राशी संपर्क करून प्राप्त करून घ्यावा.

(मुल्यांकनाचे कार्याकरीता अनुपस्थित प्राध्यापकांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील ४८/४ व ४८/५ (क) नुसार कार्यवाही घेण्यात येईल संबंधीतांनी नोंद घ्यावी.)

तसेच संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपले अधिनस्त नियमित प्राध्यापकांना तसेच संदर्भिय नस्तीला अनुसरून मा. प्र-कुलगुरू, महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार महाविद्यालयातील तीन वर्ष CHB प्राध्यापक म्हणुन कार्य केलेल्या अनुभवी CHB प्राध्यापकांना सुध्दा मुल्यांकनाकरीता Onscreen मुल्यांकन केंद्रावर उपस्थित होण्याबाबत आपले स्तरावरून आदेशीत करावे.

(डॉ. नविन पी. मुंगळे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी :-

1) मा. कुलगुरू, महोदयांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) मा. प्र.- कुलगुरू, महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
3) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
4) सर्व मुल्यांकन केंद्राधिकारी/सह मुल्यांकन केंद्राधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली (कॉमर्स अभ्यासक्रमाचे मुल्यांकनाचे कार्य CHB प्राध्यापकांना देण्यापुर्वी कॉमर्स या अभ्यासक्रमाचे विषय समिती अध्यक्ष डॉ. यु. टी. कांबळे यांचेशि संपर्क साधवा)